# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— ७/२/२००९

**दि. ७/२/२००९ रोजी घेण्यांत आलेल्या परिवहन समिती**
[illegible]

२

उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन समितीची सभा दिनांक ७/२/२००९ रोजी ४.०० वाजता वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री.कृष्णा पुजारी | सभापती |
| २. | श्री मोहन रामरख्यानी | सभापती स्थायी समिती तथा सदस्य |
| ३ | श्री.. दिलीप जेठानंद लालवानी | सदस्य |
| ४ | श्री. सच्चानंद गोपलानी | सदस्य |
| ५ | श्री. सुनिल एस. गंगवानी | सदस्य |
| ६ | श्री. मोहन रामसिंग कंडारे | सदस्य |
| ७ | डॉ. श्री. विजय रुपसिंग पाटील | सदस्य |
| ८ | श्री. जर्नादन किसन ढोके | सदस्य |
| ९ | श्री.मिलिंद जगन्नाथ चोडनकर | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१ )श्री.आशेराम इतवारी टाक ३) श्री. राजेश मुरलीधर टेकचंदानी ४)श्री. राणा सगु ५) श्री.लालता प्रसाद शिवमुर्त तिवारी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री.अशोककुमार रणखांब ,अतिरिक्त आयुक्त
२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३. श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त

४. श्री. अनंत कांबळे, प्र. मुख्यलेखा परिक्षक
५. श्री. जि.टी. जिंदे , वैदयकिय आरोग्य अधिकारी
६. श्री.ि.चिमनकारे, वहानविभाग प्रमुख

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव

सायंकाळी ४.५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

महापालिका सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨विषय क्र. १ :— मागील सभेचे दिनांक १५.४.२००८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

सदस्य श्री. सच्चानंद गोपलानी :— सभा सुचने वरील_विषयामध्ये टंकलेखन दोष आहे. ट्रान्सपोर्ट कमेटी ऐवजी ट्रान्सपर कमेटी अशी नोंद आलेली आहे.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्री. कृष्णा पुजारी :—मागील सभेचे दिनांक १५/४/२००८ रोजीचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

---

☑ मागील सभेचे दिनांक १५.४.२००८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

परिवहन समिती ठराव क्र. २ दिनांक : ७/२/२००९

सूचकाचे नाव : श्री मिलिंद चोडनकर

अनुमोदकाचे नाव : श्री जनार्दन ढोके

ही परिवहन समिती महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक १५/४/२००८ रोजीचे पृष्ठ क्र.१ ते४ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सूचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

➩**विषय क्र. २ :—** उल्हासनगर महापालिके तर्फे बी.ओ.ओ.टी. तत्वावर शहर बससेवा सुरु करण्याची माहिति देणे बाबत.

---

श्री. अशोककुमार रणखांब अतिरिक्त आयुक्त :— उल्हासनगर महापालिके अंतर्गत उल्हासनगर परिवहन सेवा बील्ट, ओन ऑपरेट आणि ट्रान्सपर (बी.ओ.ओ.टी) तत्वावर चालवायची आहे. याकामीचा ठेकेदार आपली स्वत:ची यंत्रणा उभी करेल व परिवहन सेवा चालवेल काही वर्षा नंतर आहे त्या स्थितीत तो ती उल्हासनगर महानगरपालिकेला हस्तांतरीत करेल याकामी उल्हासनगर महानगरपालिकेला कोणताही खर्च करावा लागणार नाही. समिती बससेवेचे मार्ग निश्चित करुन देईल त्याच प्रमाणे आवश्यक वाटल्यास मार्गामध्ये बदल करण्याचा अधिकार समितीस राहिल. या उपक्रमा मध्ये परिवहन वेळापत्रकाला अतिशय महत्व असते खाजगी आणि सार्वजनिक बस सेवे मध्ये फरक असतो. खाजगी बस सेवेमध्ये मनमानी पध्दतीने कारभार चालवितात. पुर्ण बस भरल्या शिवाय बस सुरु केली जात नाही. सार्वजनिक बस सेवे मध्ये निश्चित असे वेळा पत्रक असते त्या वेळा पत्रका नुसार बस सोडली जाते. भलेही त्यावेळेस दहा प्रवासी जरी असले तरी बस सोडली जाते. सार्वजनिक बस सेवेमध्ये प्रवाश्यांच्या सेवेला अग्रक्रम दिला जातो नफा नुकसान बघितले जात नाही. ही जी सार्वजनिक बस सेवा आपणास सुरु करावयाची आहे त्याबाबतीत कोणकोणत्या ठिकाणा वरुन आपणास प्रवासी मिळू शकतील याचा अभ्यास करावा लागेल. या बसेसचे वेळापत्रक काय असेल , कर्मचारी किती लागतील, याचा अभ्यास करावा लागणार आहे त्याच बरोबर प्रवाशी थांब्यांना नांवे दयावी लागतील. ठाणे परिवहन सेवेचे वाहतुकीचे ८० मार्ग आहेत. कल्याण डोबिवली परिवहन सेवे मध्ये जवळ जवळ वाहतुकीचे ५० मार्ग आहेत. उल्हासनगर महानगरपालिकेने आपल्या बस सेवे साठी सुरवातीचे ६ मार्ग निश्चित केले आहेत. जर आपली परिवहन सेवा कल्याण महापालिका क्षेत्रातही सुरु केली तर आपले वहातुकीचे मार्ग आणखी वाढू शकतील. निवेदेच्या एकुण ६८ अटी व शर्ती आहेत त्यातील महत्वाच्या १० अटी या गोषवारांत अंतर्भुत केलेल्या आहेत. त्या कदाचित आपण वाचल्या असतील.

सदस्य श्री.दिलीप लालवानी :— दि. १५.४.२००८ रोजी परिवहन समितीच्या सभापतींची निवड झाली त्यानंतर परिवहन सेवा सुरु करण्या संदर्भात प्रशासनाने प्रक्रीया चालु केली परंतु परिवहन समिती सदस्यांना त्या बाबतीत कोणतीही माहिति दिलेली नाही अश्या प्रकारे आता आपण निविदा काढून त्यास अंतिम स्वरुप दिल्या नंतर माहिती साठी हा प्रस्ताव आमच्या समोर आणला आहे असे का? परिवहन समिती सदस्यांची आवश्यकता नाही का ?

श्री. अशोककुमार रणखांब अतिरिक्त आयुक्त :— समितीची रचना होणे अगोदरच निविदा मागविण्यात आलेली होती व त्या कामी महासभेने मंजुरी दिलेली आहे.मध्यांतरीच्या कालावधीत निविदा प्रक्रीयेवर स्थगिती आदेश प्राप्त झालेला होता तो नंतर उठविण्यात आल्या नंतर आता प्रस्ताव आपल्या समोर ठेवलेला आहे.

सदस्य श्री.दिलीप लालवानी :— लोकप्रतिनिधींच्या अधिकाराचे हनन होता कामा नये शासन आणि प्रशासन हे महापालिकेच्या गाडीची दोन चाके आहेत यांच्या मध्ये संकुलन असायला पाहिजे. आपण जे काही केले आहे ते आपण आपसा मध्ये केले आहे सभापतीना विश्वासात घेतलेले नाही. सभापती फक्त गाडी मध्ये फिरण्यास नसतात आपण जर सभापतींना या बाबतीत काही सांगीतले असते तर त्यांनी आम्हाला त्यांची सविस्तर माहिती दिली असती.धोरण ठरविणारे आम्ही आहोत आम्ही घेतलेल्या निर्णयांची प्रशासनाने अंमलबजावणी करायची असते

सदस्य श्री.सच्चानंद गोपलानी :— आता आता अतिरिक्त आयुक्त साहेबांनी सांगितले की, ही समिती स्थापनही झालेली नव्हती तेव्हा निविदी मागविण्यात आलेली होती. जर समिती अस्तित्वात नव्हती तर निविदा कोणी आणि कशी मागीतली.?

श्री. अशोककुमार रणखांब अतिरिक्त आयुक्त :— आपणास माहिती देणे हे सभापती महोदय यांचे काम आहे आणि त्यांच्या सांगण्या नुसार सचिव साहेबांकडून सभेचे आयोजन केले जाते.

सदस्य श्री.दिलीप लालवानी :— निविदा प्रक्रीये कामी जी काही कार्यवाही होत आहे त्याबाबत आपण सभापती महोदयांना पत्र दिले आहे काय? सभापतींची निवड होवून १० ते १२ महिने झाले आमचे सभापती फक्त गाडीला फलक लावुन शहरात फिरण्यासाठी नाहीत . १९८६ पासुन परिवहन सेवा चालु करण्याचे आमचे स्वप्न होते ते आता कुठे प्रत्यक्षात येत आहे.परिवहन सेवे संदर्भात निविदा मागविण्या बाबतीत महासभेने ठराव पारीत केला आहे. महासभा ही सर्वोच्च समिती असल्याने त्या बाबतीत आमची काहीही हरकत नाही आम्हाला ऐवढेच

म्हणायचे आहे की, लोकप्रतिनिधीच्या अधिकाराचे हनन होता कामा नये. परिवहन समिती पुढे फक्त परिवहन उपक्रमच असेल की, महापालिके मध्ये जी वहाने भाडयाने पुरविली जातात त्या बाबतचा विषय सुधा आमच्या अधिकार क्षेत्रात असेल.?

डॉ.पाटील :– श्री. दिलीप लालवानी यांनी येथे जे प्रश्न विचारले या प्रश्नांची उत्तरे त्या प्रशिक्षण सत्रामध्ये ६ तासाच्या चर्चे मध्ये देण्यात आली होती.

सदस्य श्री.मोहन कंडारे :– आपण जे ६ मार्ग निवडले आहेत ते निश्चित झाले आहेत का? ते कोण कोणते आहेत?

महापालिका सचिव :– ते मार्ग कोणते आहेत त्या बाबतचा सविस्तर प्रस्ताव नंतर आपणा समोर येईल.

काही सदस्य:–पास,पास.......

सभापती, श्री. कृष्णा पुंजारी :–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ विषय क्र.२ :– उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे बी.ओ.ओ.टी. तत्वावर शहर बस सेवा सुरु करण्याची माहिती देणे बाबत.

प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ ( २० ) अनुसार शहराअंतर्गत किंवा शहराच्या हद्दीबाहेर महानगरपालिका ठराव क्र. ३५ दिनांक १३/०७/२००७ पारीत करुन उल्हासनगर क्षेत्रातील पब्लीक प्रायव्हेट पार्टीशिपेशन अंतर्गत बिल्ट ओन ऑपरेट ट्रांस्फर ( बी.ओ.ओ.टी. ) या तत्वावर उपक्रम चालविणे करीता निश्चित केले. महापालिकेने ठराव क्रमांक ४० दिनांक २३/०८/२००७ अन्वये परीवहन समितीची रचनाही केलेली आहे.

हा उपक्रम राबविणेसाठी डिसेंबर २००८ महिन्यात निविदा प्रक्रीया सुरु करण्यात आली असुन सदर निविदेची छानणी करण्यात येत आहे.

सदर ( बी.ओ.ओ.टी. ) या तत्वावर बस सेवा उपक्रम राबवितांना महापालिकेस आर्थिक गुंतवणूक करावी लागणार नाही, चालक वाहक किंवा इतर कर्मचारी नेमण्याची आवश्यकता असणार नाही व कसल्याही त–हेचा खर्च करावा लागणार नाही. तसेच कसल्याही त–हेचा तोटा देखील सहन करावा लागणार नाही. तसेच महापालिकेस रॉयल्टी किंवा इतर स्वरुपात फायदे मिळणार आहेत.

या अनुषंगाने निविदेच्या एकुण ६८ अटी व शर्ती सोबत सादर केलेल्या आहेत.सदर निविदेच्या काही ठळक अटी व शर्ती खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

१. या निविदेचे उदि्दष्ट एक विशीष्ट, कार्यसक्षम व प्रभावी व्यक्ति/संस्था/फर्म/एजन्सी/कंपनी यांची नेमणूक करून त्याचे मार्फत नागरिकांना प्रगत व उच्च क्षमतेची शहर बससेवा उपलब्ध करून देण्याचे आहे.
२. उल्हासनगर महानगरपालिके अंतर्गत "उल्हासनगर परिवहन उपक्रम" या नावाने शहर बस वाहतूक "बिल्ट, ओन, ऑपरेट आणि ट्रान्सफर" (**B.O.O.T.**) तत्वावर चालवावी लागेल.
३. हा करार १० (दहा) वर्षासाठी असेल व हा कालावधी कार्यादेशाच्या ६० दिवसांपासून किंवा ज्या दिवशी प्रथम बस सेवा सुरू होईल दोन्ही पैकी जो दिनांक अगोदर येईल त्या दिवसापासून लागू होईल.
४. बस खरेदीसाठी व्यक्ति/संस्था/फर्म/एजन्सी/कंपनी कर्ज घेऊ शकते परंतु यासाठी महापालिका गॅरंटर राहणार नाही व तसेच कोणत्याही प्रकारचे कर्जाचे उत्तरदायीत्व महापालिकेवर राहणार नाही.
पुढील प्रमाणे अटही टाकण्यात आलेली आहे.

५. या उपक्रमासाठी उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे कोणत्याही प्रकारचा खर्च केला जाणार नाही. कामगार व इतर दायीत्व सदंर्भात महापलिके विरूध्द दावा / खटला किंता इतर कायदेशिर प्रक्रिया दाखला करता येंणार नाही. या सर्व बाबीसाठी व्यक्ति/संस्था/फर्म/एजन्सी/कंपनी हे जबाबदार राहतील. बससेवेसाठी योग्य त्या कर्मचाऱ्यांची नेमणूक त्यांचा पगार, भत्ते, ड्रेस इत्यादींचा खर्च

व्यक्ति/संस्था/फर्म/एजन्सी/कंपनी यांना करावा लागेल. बससेवा कर्मचाऱ्यांचा महानगरपालिकेशी काहीही संबंध राहणार नाही. सदर कर्मचारी संबंधित व्यक्ति/संस्था/फर्म/एजन्सी/कंपनी यांचे कर्मचारी असतील व त्यांना महानगरपालिकेच्या नोकरीबाबत हक्क मागता येणार नाही. तसेच महानगरपालिका कार्यालयाशी नोकरीचा हक्क प्रस्थापित करता येणार नाही.

६ सुरूवातीचे तिकीट दर सक्षम प्रधिकारी यांनी ठरविलेल्या कमाल/ किमान मर्यादीत असावे.या साठी योग्य परवानगी घेतल्यानंतर ते दर लागु करण्यात येतील वेळावेळी शासनाच्या नियमानुसार पात्र नागरिक, विद्यार्थ्यी व इतर यांना प्रवाशांसाठी सवलती व पासेस द्यावे लागतील तसेच याकरीता महापालिकेकडुन कोणत्याही प्रकारचा मोबदला मागता येणार नाही.

७. शहरा बाहेरील मार्गांवर बस चालविण्यासाठी या निविदापत्रकात दिलेल्या सर्व अटी व शर्तीनुसार बससेवा चालवावी लागेल आणि मान्य केलेल्या रॉयल्टी महापालिकेकडे भरावी लागेल तसेच विविध महापालिका/नगरपालिका/शासन/ संस्थांकडून परवाने/नाहरकत दाखले नियमाप्रमाणे घेणे आवश्यक राहील.

८. करार संपल्यानंतर कर्जाची पुर्णपणे परतफेड करून बसेस कोणत्याही प्रकारचा मोबदला न घेता विनाविलंब व्यक्ति/संस्था/फर्म/एजन्सी/कंपनी हे उल्हासनगर महानगरपालिकेला सुस्थितीत करारनामा करून हस्तांतरीत करतील.

९. जेव्हां जेव्हां योग्य त्या मंजुरी नंतर तिकीट दर बदलण्यात येतील आणि त्यातुन ज्या टप्यासाठी सर्वात जास्त टक्केवारीने तिकीट दरांत बदल होईल त्या टक्केवारी नुसार मंजुर रॉयल्टी दरातही फेरबदल होईल व त्यानुसार व्यक्ति/संस्था/फर्म/एजन्सी/कंपनी यांना रॉयल्टीची रक्कम द्यावी लागेल, परंतु निविदेत मंजुर झालेल्या रॉयल्टी दरापेक्षा हे दर कमी करता येणार नाहीत म्हणजे तीकिट दरात झालेल्या फेरबदलामुळे रॉयल्टी दर किंवा प्रथम निविदेत मंजुर रॉयल्टी दर यादोहोंपैकी जे कमाल असेल ते देय राहील.

१०. करारनाम्याच्या कालावधीत शासनाच्या धोरणत काहि बदल झाले, तसेच शासनाच्या काही परीवहन सेवा बाबत निर्णयात काहि बदल झाले तर ते व्यक्ती/ संस्था/फर्म/एजेंन्सी/कंपनी यांना मान्य करावे लागतील. त्यामुळे परीवहन उपक्रमात जे काहि नकारार्थी परीनाम होतील ते व्यक्ती/ संस्था/फर्म/एजेंन्सी/कंपनी यांना सोसावे लागतील. व झालेल्या नुकसानाची भरपाई उल्हासनगर महानगरपालिकेकडुन करता येणार नाही व या बाबत उल्हासनगर महानगरपालिकेला जबाबदार ही ठरविता येणार नाही.

सदर ( बी.ओ.ओ.टी. ) या तत्वावर शहर बस सेवा उपक्रम राबवितांना महापालिकेस कुठल्याही प्रकारचा खर्च न करता शहर वासियांना उपक्रमचा लाभ मिळणे शक्य होईल. तसेच ( बी.ओ.ओ.टी. ) या तत्वावर शहर बस सेवा उपक्रम राबविण्याच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी मंजुरी मिळावी.

परिवहन समिती ठराव क्र. ३ दिनांक : ७/२/२००९

सूचकाचे नाव : श्री सुनिल गंगवानी

अनुमोदकाचे नाव : श्री दिलीप लालवानी

ही परिवहन समिती उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे बिल्ट,ओन,ऑपरेट आणि ट्रान्सफर ( B. O .O .T.) या तत्वावर शहर बस सेवा सुरू करण्याची माहिती विचारात घेवून आलेल्या निविदांची छाननी करून पुढच्या सभेत न्युनतम दराच्या निविदाकाराशी संविदा करण्याचा प्रस्ताव सादर करण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

सूचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव</u> :— विषय क्रमांक.३ वाचून दाखवितात.

---

☑ **विषय क्र .३ :— उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे शहर बस सेवा सुरु करणेच्या संदर्भात विविध शहरास भेट देण्याच्या खर्चास मंजुरी मिळणे बाबत.**

---

<u>सदस्य श्री.दिलीप लालवानी :—</u> खर्चा साठी परिवहन समितीच्या अर्थसंकल्पात काही तरतुद ठेवली आहे का? परिवहन सेवेच्या अभ्यासा साठी काही शहरांचा दौरा करण्याची वेळ आली तर त्या दौरा मध्ये कोण कोणते सदस्य असतील. ?
<u>सदस्य श्री.सच्चानंद गोपलानी :—</u> अतिरिक्त आयुक्त साहेब पुण्याच्या दौरामध्ये आपण आमच्या बरोबर होतात त्यावेळी आम्हाला असे दिसुन आले की आपणास परिवहन सेवे बाबत बरेचसे ज्ञान आहे. तर या दौरा मध्ये असे काही अधिकारी असावे की ज्यांना परिवहन सेवे बाबत ज्ञान आहे आणि आवड आहे आणि त्याच बरोबर आमच्या काही सदस्यांना या दौरामध्ये सहभागी करुन घ्यावे.
<u>सदस्य श्री.मोहन कंडारे :—</u> परिवहन सेवेचा अभ्यास करण्यासाठी परिवहन समितीचे सदस्य आणि संबधित काही अधिका—यांना पाठविले जावे.
<u>काही सदस्य :—</u> पास पास...

<u>सभापती, श्री. कृष्णा पुंजारी :—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र .३ :— उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे शहर बस सेवा सुरु करणेच्या संदर्भात विविध शहरास भेट देण्याच्या खर्चास मंजुरी मिळणे बाबत.**

प्रस्तावना.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ ( २० ) अनुसार शहराअंतर्गत किंवा शहराच्या हद्दीबाहेर महानगरपालिका ठराव क्र. २५ दिनांक १३/०७/२००७ पारीत करुन उल्हासनगर क्षेत्रातील पब्लीक प्रायव्हेट पार्टीशिपेशन अंतर्गत बिल्ट ओन ऑपरेट ट्रांस्फर ( बी.ओ.ओ.टी. ) या तत्वावर उपक्रम चालविणे करीता निश्चित केले.

हा उपक्रम राबविणेसाठी डिसेंबर २००८ महिन्यात निविदा प्रक्रीया सुरु करण्यात आली असुन सदर निविदेची छानणी करण्यात येत आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे शहर बस सेवा उपक्रम राबविण्याच्या संदर्भात इतर शहरातील जसे बेंगलोर,जालंधर इत्यादी ठिकाणी सुरूळीत व आधुनिक पदधीतेने सुरू असलेली परिवहन सेवेची पाहणी करणे व त्यातील महत्वाच्या बाबी उल्हासनगर परिवहन सेवेत आमंलात आणण्यासाठी वरील शहरास भेट देणे गरजेचे आहे. सदर शहर बस सेवा उपक्रम राबविण्याच्या संदर्भात वरील शहरास भेट देण्यास होणा—या खर्चाच मा. परिवहन समितीची मंजुरी मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

परिवहन समिती ठराव क्र. ४ दिनांक : ७/२/२००९

सूचकाचे नाव : श्री सच्चानंद गोपलानी

अनुमोदकाचे नाव डॉ.विजय पाटील :

ही परिवहन समिती उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे शहर बस सेवा उपक्रम सुरळीत व आधुनिक पध्दतीने सुरू करणेकामी संबंधित अधिका—यासह परिवहन समितीच्या सदस्यास बंगलोर,जालंधर इत्यादी ठिकाणच्या परिवहन सेवेची पाहणी व अभ्यास करण्यास आणि त्याप्रयोजनार्थ अर्थसंकल्पीय अंदाजात आवश्यक त्या निधीच्या तरतुदीस मान्यता देत आहे.

सूचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ४.३० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री.कृष्णा पुंजारी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं.कुकरेजा)
महापालिका सचिव,
उल्हासनगर महानगरपालिका

---

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— १२/२/२००९

**दि. १२/२/२००९ रोजी घेण्यांत आलेल्या परिवहन समिती**

३

उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन समितीची सभा गुरुवार दिनांक १२/२/२००९ रोजी दुपारी १.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. कृष्णा गिरीया पुजारी | सभापती, परिवहन समिती |
| २ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | सभापती, स्थायी समिती तथा सदस्य |
| ३ | श्री. सच्चानंद गोपलानी | सदस्य |
| ४ | श्री. सुनिल एस. गंगवानी | सदस्य |
| ५ | श्री.आशेराम इतवारी टाक | सदस्य |
| ६ | श्री. राजेश मुरलीधर टेकचंदानी | सदस्य |
| ७ | श्री. मोहन रामसिंग कंडारे | सदस्य |
| ८ | श्री. दिलीप जेठानंद लालवानी | सदस्य |
| ९ | श्री. राणा सगु | सदस्य |
| १० | डॉ. श्री. विजय रुपसिंग पाटील | सदस्य |
| ११. | श्री.मिलिंद जगन्नाथ चोडनकर | सदस्य |
| १२. | श्री. जर्नादन किसन ढोके | सदस्य |

तर,

सदस्य श्री.लालता प्रसाद शिवमुर्त तिवारी हे अनुपस्थित होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

७. श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त
८. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
९. डॉ. दिपक सावंत, उप–आयुक्त
१०. श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी
११. श्री. अनंत कांबळे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
१२. डॉ. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
१३. श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव

दुपारी १.१० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

महापालिका सचिव :– विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १ :– मागील सभेचे दिनांक ७/२/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

सदस्य श्री. दिलीप लालवानी :–सभेमध्ये आम्ही बोललेले शब्द न शब्द इतिवृत्तामध्ये आला पाहिजे. मागील सभेत मी म्हटले होते की, आम्ही सदस्य धोरण ठरविणारे आहोत. तर आम्ही ठरविलेल्या धोरणाची अंमलबजावणी करणे हे प्रशासनाचे काम आहे. याची इतिवृत्तांतात नोंद आली नाही.

महापालिका सचिव :– आपल्या चर्चेतील शब्द न शब्द इतिवृत्तात आला पाहिजे असे काही नाही. विषयाशी/ठरावाशी संबंधीत चर्चेचा सारांश इतिवृत्तामध्ये आला पहिजे. त्यानुसारची नोंद इतिवृत्तांतात आलेली आहे.

सदस्य श्री. दिलीप लालवानी :–इतिवृत्तांतातील एका ठरावावर सुचक आणि अनुमोदकाचे नावाची नोंद आलेली नाही.

महापालिका सचिव :–ठरावावर सूचक आणि अनुमोदन म्हणुन कोणी स्वाक्ष–या केल्या आहेत याची पडताळणी त्याची नावे लिहून घेतली जातील.

काही सदस्य :–पास, पास.....

सभापती, श्री. कृष्णा गिरीया पुजारी:– दिनांक ७/२/२००७ रोजीच्या सभेच्या इतिवृत्तांताबाबत मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी यांनी सुचविलेली सुधारणा करुन उर्वरीत इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. १ :—** मागील सभेचे दिनांक ७/२/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. सुनिल गंगवानी

अनुमोदकाचे नांव : श्री. मोहन कंडारे

<u>परिवहन समिती ठराव क्र. :— ४ अ</u> <u>दिनांक:— १२/२/२००९</u>

ही परिवहन समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक ७/२/२००९ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ८ पर्यंतचे इतिवृत्तात सदस्य श्री. दिलीप लालवानी यांनी सुचविलेली सुधारणा करुन उर्वरीत इतिवृत्त जसे आहे तसे कायम करीत आहे.

<u>एकमताने</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. २</u> :— परिवहन उपक्रमाचे सन २००९—२०१० चे अंदाजपत्रक तयार करणे.

---

<u>श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त):—</u> आपण परिवहन उपक्रमाद्वारे जी बससेवा चालु करणार आहोत त्यातील बसेस ठेकेदाराकडुन चालविण्यात येणार आहेत.
सदस्य श्री मोहन कंडारे :—आयुक्तांचे अंदाजात तुट दिसून येते ती कोठून भरून काढणार ?
<u>श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):—</u>मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकांमध्ये तीन प्रकारचे अर्थसंकल्प तयार केले जातात. त्यातील 'ब' अर्थसंकल्प परिवहन उपक्रमासाठी असतो तर 'क' अर्थसंकल्प हा पाणी पुरवठया संदर्भासाठी असतो. व 'अ' अर्थसंकल्प हा सर्वसाधारण बाबींसाठी असतो. आता आपण जो परिवहन उपक्रम सुरु करणार आहोत तो बीओओटी या तत्वानुसार सुरु करणार आहोत.आणि त्या अन्वये यावर्षी आपणांस अंदाजे पाच लाख रुपयाचे उत्पन्न मिळणाार आहे आणि १० लाख रुपये खर्चाचा अंदाज आहे. उत्पन्नाशी तुलना करता ५ लाख रुपयाची जी तुट आहे ती 'अ' अंदाजपत्रकातुन वर्ग करण्याचे प्रस्तावित आहे. या व्यतिरिक्त वाढीव खर्च झाल्यास पुढील वर्षी सुधारीत अर्थसंकल्पान्वये मंजुरी घेतली जाईल.

<u>सदस्य श्री. मोहन कंडारे :—</u>परिवहन सदस्यांची नेमणुक झालेली आहे. त्यांच्या मानधनासाठी अर्थसंकल्पात काही रक्कमेची तरतुद करण्यात आली आहे काय?

<u>श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):—</u> परिवहन समिती सदस्यांना मानधन दयावे लागणार असल्याने सदस्यांच्या मानधन व बैठक भत्त्यासाठी करण्यात येणा—या तरतुदीमध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव सचिव कार्यालयाकडुन आम्हांस प्राप्त झालेला आहे. त्यानुसार अर्थसंकल्पात ९५ लाख रुपयाची तरतुद आम्ही ठेवलेली आहे.

<u>सदस्य श्री. दिलीप लालवानी :—</u>परिवहन समिती सदस्याच्या मानधन व बैठकभत्त्यासाठी स्वतंत्रपणे प्रस्ताव/तरतुद ठेवण्याची आवश्यकता नाही काय?

सदस्य डॉ विजय पाटील:— २३/८/२००७ रोजी परिवहन समितीची नेमणुक झाली त्यानंतर १५/४/२००८ रोजी परिवहन समिती सभेत सभापतींची निवड करण्यात आली. परिवहन समिती विषयी कल्याण नविमुंबई महानगरपालिकेमध्ये जे ठराव झाले आहेत त्यांची मी प्रत आणुन दिली आहे. त्या महापालिकेने त्यांच्याकडे परिवहन सेवा चालु झाली तेव्हापासुन मानधन देणे चालु केले आहे. त्यानंतर त्यामध्ये वाढ करण्यात आलेली आहे. त्यानुसार आम्हांलाही आजपर्यंतचे मानधन मिळाले पाहिजे. दुसरे असे की, एप्रिल, २००८ मध्ये सभापतींची नियुक्ती झाली आहे. त्यांना महापालिकेतर्फे वाहन किंवा वाहनभत्ता मिळाला पाहिजे. भत्ता देण्याची तरतुद नसेल तर वाहन दिले पाहिजे. तसेच केबीनसाठी आम्ही आयुक्त साहेबांना भेटलो होतो. त्यावेळी त्यांनी सांगितले की, वुडलॅण्ड अपार्टमेंटमध्ये आपल्या कार्यालयासाठी व्यवस्था केलेली आहे. परंतु आमचे म्हणणे आहे की, आम्हांला महापालिका इमारतीमध्येच केबीन मिळाली पाहिजे.

सदस्य श्री. दिलीप लालवानी :—कार्यालय जवळ असले तर अधिका—यांशी चांगल्याप्रकारे समन्वय होवु शकतो.

सदस्य श्री. मोहन कंडारे / श्री. सुनिल गंगवानी :—अधिका—यांशी समन्वय साधण्यासाठी मुख्यालयातच सभापतींच्या कॅबीनसाठी जागा मिळाली पाहिजे.
श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त):— सदस्यांच्या भावना मी आयुक्त साहेबांच्या कानी घालतो.

सदस्य श्री. मोहन कंडारे/ श्री. दिलीप लालवानी:—भावना नाही मागणी आहे.त्याअनुषंगाने आयुक्ताचे अंदाजा प्रमाणे उत्पन्न ५ लाख व खर्च रू.१० लाख दर्शविले आहे ही तरतुद फारच कमी असून उत्पन्न ५ लाख व खर्च २५ लाख असण्यासाठी या सभेत प्रस्तावित करीत आहे.

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त):—मागणी आहे तर ती मी आयुक्तांच्या कानी घालेन.

सदस्य श्री. दिलीप लालवानी :—आम्हांला कार्यालयाची आवश्यकता आहे. आम्हांला महापालिका मुख्यालयाच्या इमारतीतच कार्यालयासाठी जागा मिळाली पाहिजे. कारण की परिवहन समितीची नियुक्ती महासभेने केलेली असल्याने परिवहन समितीची मागणी ही महासभेची मागणी आहे असे आपण समजा. आणि मागणीची पुर्तता करण्यासाठी महापालिका मुख्यालयातच आम्हांला कार्यालयासाठी जागा मिळाली पाहिजे.

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त):—आपण याबाबत अगोदर आयुक्त साहेबांना भेटला आहात. आता आपली जी मागणी आहे ती मी आयुक्त साहेबांच्या कानी घालेन. त्यावर ते निर्णय घेतील. सभा संपल्यानंतर पाच मिनिटातच मी त्यांची भेट घेवुन आपली मागणी त्यांच्या कानी घालेन.

सदस्य श्री. सुनिल गंगवानी :—आता आपण आयुक्तांच्या आसनावर बसला आहात. आपणांस निर्णय घेण्याचा अधिकार नाही काय? आजच्या या सभेमध्ये आपण प्राधिकारी आहात. आपणांस निर्णय दयायचा आहे.

सदस्य श्री. मोहन कंडारे :—२००९—१० चा हा जो अर्थसंकल्प आहे याचा महापालिकेच्या अर्थसंकल्पात समावेश केला आहे काय?

श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):—होय, समावेश केला आहे.

सदस्य श्री. दिलीप लालवानी :—या अर्थसंकल्पात उत्पन्न पाच लाख रुपये आणि खर्च १० लाख रुपये दर्शविला आहे. यामध्ये मानधन, वाहन भत्ता व इतर जे दोन तीन भत्ते आहेत त्यासाठी आणखी पंधरा लाख रुपयाची तरतुद केली जावी. व २००८—०९ चा जो सुधारीत अर्थसंकल्प आहे त्यामध्ये परिवहन समितीसाठी काही तरतुद केली आहे काय?

सदस्य श्री दिलीप लालवानी :— या अर्थसंकल्पामध्ये उत्पन्न पाच लाख रुपये दर्शविले आहे आणि खर्चासाठी २५ लाख रुपयाची तरतुद करण्यात येत आहे. असा या समितीचा प्रस्ताव आहे.

सदस्य श्री. मोहन कंडारे :—या सभेचे इतिवृत्त केव्हा कायम होईल? कारण की, या सभेचा ठराव आज संध्याकाळी ४.०० वाजता होणा—या स्थायी समिती सभेमध्ये जाणार आहे, त्यावर तेथे चर्चा होणार आहे.

काही सदस्य :—''या ठरावा अंतर्गतचा निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेंट अंमलात आणण्यात येईल'' असे एक वाक्य या ठरावात समाविष्ट केले जावे.

सभापती, श्री. कृष्णा गिरीया पुजारी:— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र.** २:— परिवहन उपक्रमाचे सन २००९—२०१० चे अंदाजपत्रक तयार करणे.

प्रस्तावना.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम ९८ च्या तरतुदीप्रमाणे परिवहन व्यवस्थापकाचे अंदाज विचारा घेवुन ''ब'' अर्थसंकल्पीय अंदाज परिवहन समितीने तयार करावयाचे आहेत. सदर अंदाजात परिवहन उपक्रमाचे संपादन, त्याचा विस्तार, त्याचे प्रशासन, चालविणे व त्याची व्यवसाी यामूळे महानगरपालिका ज्याबद्दल या अधिनियमान्वये दायी असेल अशा सर्व रक्कमा आणि मुद्दल व व्याज यांचे हप्ते, जसजसे देय होतील तसतसे ते भरण्याबाबत तरतुद केली पाहिजे. महानगरपालिकेने परिवहन उपक्रम खाजगी सहभागाने राबविण्याचे योजले असून अधिनियमातील तरतुदीनुसार वित्तीय वर्ष २००९—२०१० चें उत्पन्न व खर्चाचे अंदाज पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

'ब' अंदाजपत्रकीय उत्पन्न : ५००
'ब' अंदाजपत्रकीय खर्च : १००० (आकडे हजारात)

वर्ष २००९—१० करीता उत्पन्न व खर्चाचे अदांज लक्षात घेता, राहणारी तुट 'अ' अंदाजपत्रकातून वर्ग करण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ मधील कलम ९८ च्या तरतुदीप्रमाणे उत्पन्न व खर्चाचे परिवहन उपक्रमासमोर सादर करण्यात येत आहे.

परिवहन समिती सभा ठराव क्र. ५ दिनांक : १२/२/२००९

सूचकाचे नाव : श्री. दिलीप लालवानी
अनुमोदकाचे नाव : श्री. मोहन कंडारे

ही परिवहन समिती वरील मुंबई महानगरपालिका अधीनियम १९४९ च्या कलम ९८ मधील सर्व तरतूदीस अधिन राहून सन २००९—१० चे परिवहन व्यवस्थापकाचे अदांज विचारात घेवून परिवहन उपक्रमाचे पुढीलप्रमाणे फेरफार करुन अदांजपत्रक मंजुरी करीत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 'ब' अंदाजपत्रकीय उत्पन्न | : | ५०० | (आकडे हजारात) |
| 'ब' अंदाजपत्रकीय खर्च | : | परिवहन सेवा खर्च १००० | |
| सभासदांना मानधन व इतर भत्ते | | १५०० | |
| एकुण खर्च | | २५०० | |

उत्पन्न व खर्चाचे अदांज लक्षात घेता, राहणारी तुट 'अ' अदांपजत्रकातुन वर्ग करण्यास मंजुरी देत आहे.

या ठरावा अंतर्गतचा निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सूचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी

दुपारी १.३० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्री. कृष्णा गिरीया पुजारी यांनी जाहिर केले.

**(प्रकाश पं. कुकरेजा)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २७/२/२००९

दि. २७/२/२००९ रोजी घेण्यांत आलेल्या परिवहन समिती सभेचे इतिवृत्त.

४

उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन समितीची सभा शुक्रवार दिनांक २७/२/२००९ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. कृष्णा गिरीया पुजारी | सभापती, परिवहन समिती |
| २ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | सभापती, स्थायी समिती तथा सदस्य |
| ३ | श्री. सच्चानंद गोपलानी | सदस्य |
| ४ | श्री. सुनिल एस. गंगवानी | सदस्य |
| ५ | श्री.आशेराम इतवारी टाक | सदस्य |
| ६ | श्री. राजेश मुरलीधर टेकचंदानी | सदस्य |
| ७ | श्री. मोहन रामसिंग कंडारे | सदस्य |
| ८ | श्री. दिलीप जेठानंद लालवानी | सदस्य |
| ९ | श्री. राणा सगु | सदस्य |
| १० | डॉ. श्री. विजय रुपसिंग पाटील | सदस्य |
| ११. | श्री.मिलिंद जगन्नाथ चोडनकर | सदस्य |
| १२. | श्री. जर्नादन किसन ढोके | सदस्य |

तर,

सदस्य श्री.लालता प्रसाद शिवमुर्त तिवारी हे अनुपस्थित होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१४. श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त
१५. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
१६. डॉ. दिपक सावंत, उप–आयुक्त
१७. श्री. अशिष मिश्रा, सदस्य व फूकल्टी प्रमुख मुध्यवर्ती रस्ते वाहतुक संस्था, पुणे
१८. श्री. अनंत कांबळे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
१९. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
२०. श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

३. श्री. श्याम शिवनानी
४. श्री. तानाजी पतंगराव
५. श्री. विनोद केणे

दुपारी ३.४० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १ :–</u> मागील सभेचे दिनांक १२/२/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास, पास.....

<u>सभापती, श्री. कृष्णा गिरीया पुजारी:–</u> दिनांक १२/२/२००७ रोजीच्या परिवहन समितीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. १ :–** मागील सभेचे दिनांक १२/२/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. मोहन कंडारे

अनुमोदकाचे नांव : डॉ. विजय पाटील

<u>परिवहन समिती ठराव क्र. :– ५ अ</u> <u>दिनांक:– २७/२/२००९</u>

ही परिवहन समिती महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक १२/२/२००९ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ५ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करीत आहे.

<u>एकमताने</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :–** उल्हासनगर शहरात बससेवा सुरु करणे.कामी न्युनत्तम दराचे निविदाकार यांच्याशी केलेल्या संविदेस मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. दिलीप लालवानी :–**या विषयाचा जो गोषवारा देण्यात आला आहे त्यामध्ये असा उल्लेख करण्यात आला आहे की, आयुक्तांच्या दालनात श्री. आशिष मिश्रा सदस्य, सीआरआरटी पुणे यांच्या सोबत झालेल्या बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने निविदेतील अट क्र. ४५ मध्ये बदल करण्यात आला आहे. त्याबाबतीत माझे म्हणणे असे आहे की, ज्या अटी शर्तीनुसार निविदा मागविण्यात आली त्या सर्व अटी शर्ती कायम ठेवल्या जाव्यात. तसेच माझ्या असेही ऐकिवात आले आहे की, ठेकेदाराने पत्र दिले आहे. त्या पत्रात काय लिहिले आहे ते वाचुन दाखविले जावे. आयुक्त साहेबांचे म्हणणे आहे की, शहर बससेवा ही शहरवाशियांच्या सेवेसाठी आहे. फायदा मिळविण्यासाठी नाही. आपण ही बससेवा बीओओटी तत्वानुसार सुरु करत आहोत. त्यामध्ये महानगरपालिकेचा एक रुपया सुध्दा खर्च न होता शहरवाशियांना ही सेवा मिळणार आहे. निविदेमध्ये आपण जास्त अटी, शर्ती ठेवाल तर निविदा घेण्यास कुणी पुढे येणार नाही.

**सदस्य श्री. मिलिंद चोडणकर:–** शहर बससेवेसाठी महानगरपालिकेस आपला स्वत:चा एक नया पैसा सुध्दा खर्च करावा लागणार नाही. बिना पैशामध्ये आपणास सेवा उपलब्ध होणार असल्याने संविदेस मान्यता दिली जावी.

**सदस्य श्री. दिलीप लालवानी:–**या प्रस्तावाच्या गोषवा–यात ज्या जोडपत्राचा उल्लेख करण्यात आलेला आहे ते जोडपत्र आम्हांस मिळाले नाही.

**महापालिका सचिव:–** जोडपत्रात फक्त ऑपरेशन प्लॅन आणि रुटस् प्लॅन आहेत.

**सदस्य श्री. दिलीप लालवानी:–** जोडपत्रात जे काही आहे त्याची प्रत आम्हांस दिली जावी.

**सभापती, श्री. कृष्णा गिरीया पुजारी:–**सुरूवातीस १० बसेस चालविल्या जाणार आहेत ही संख्या पुरेशी आहे व बसेसचे मॉडेल सुध्दा चांगले आहे. सीआयआरटी, पुणे यांचे कडील अधिकारी श्री. आशिष मिश्रा हे येथे उपस्थित आहेत त्यांनी याबाबतचा खुलासा करावा अशी मी त्यांना विनंती करतो.

**श्री. आशिष मिश्रा (अधिकारी, सीआरआरटी, पुणे):–**उल्हासनगर शहरात बससेवा सुरु करण्याकामीचा जो प्रस्ताव होता, त्याचा आम्ही सविस्तर अभ्यास केला आहे. बससेवेसाठी फार मोठया प्रमाणावर खर्च करावा लागणार असल्याने स्वत:ची बससेवा सुरु करणे महानगरपालिकेला परवडणारे नाही. आम्ही आपल्या निविदेची छाननी केली आहे, त्यामध्ये सर्वात जास्त दराचा जो निविदाकार आहे, त्याच्याशी आम्ही चर्चा केली आहे. पैसा कमविणे हे महापालिकेचे ध्येय नाही नागरीकांना बससेवा उपलब्ध करुन देणे हे महापालिकेचे ध्येय आहे. त्यामुळे हा जो प्रस्ताव आहे तो योग्य असून त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**सदस्य श्री. दिलीप लालवानी:–**काही अपरिहार्य कारणामुळे कोणत्याही मार्गावरील बससेवा बंद राहिली उदा. रस्ता दुरुस्ती अभावी किंवा मोर्चे, संप, अपघात अन्य कोणतीही तांत्रिक अडचण आल्यास ज्या कालावधीपर्यंत बस सेवा बंद असेल त्या कालावधीमधील रॉयल्टी रक्कम घेतली जावु नये.

**श्री. आशिष मिश्रा (अधिकारी, सीआरआरटी, पुणे):–**जसे की, भुकंप होतो किंवा आकस्मित काही घटना घडते त्यावेळेस रॉयल्टी आकारली जाणार नाही कारण की, या घटना घडविणे किंवा टाळता येणे हे काही आपल्या हातात नसते.

श्री. आशिष मिश्रा (अधिकारी, सीआरआरटी, पुणे):—महापालिकेस मिळणारी रॉयल्टी रुपये ०.५५ पैसे प्रति किलोमिटर ही वाजवी आहे. प्रत्यक्षात ३० ते ३५ पैसे आपणांस जास्त मिळत आहेत. कोणत्या मार्गावर बससेवा चालु करणार आहे हे त्यांनी पाहायचे आहे. रेल्वे स्टेशन व आसपासच्या तीन चार मार्गावर ही बससेवा चालु शकणार आहे. आणि पायाभुत सुविधा त्यांना स्वत: उभ्या कराव्या लागणार आहेत याचा विचार करता रॉयल्टी संदर्भात जास्त काही विचार करण्याची आवश्यकता नाही. या बससेवेमध्ये त्यांना फार मोठी कमाई होईल असे काही संभवत नाही.

सदस्य श्री. दिलीप लालवानी :—ठेकेदाराचे म्हणणे आहे की माझ्याकडे स्वत:ची बरीच मिळकत आहे. या परिवहन उपक्रमातुन मला पैसा कमवायचा नाही शहरवाशियांना चांगली बससेवा उपलब्ध करुन दयायची आहे.

सदस्य श्री. राजेश टेकचंदानी:—परिवहन उपक्रमावर जर महानगरपालिका काहीही खर्च करणार नसेल .सर्व बाबींसाठी जर ठेकेदारानेच खर्च करायचा आहे तर मग ठेकेदारास काय फायदा मिळणार आहे?

श्री. आशिष मिश्रा (सदस्य, सीआरआरटी, पुणे):— बसेस विकत घेवुन त्यांची योग्यप्रकारे निगा ठेवणे आवश्यक आहे. त्या दोन तीन वर्ष चालतात आणि नंतर बंद पडतात, असे होता कामा नये. बी.ओ.ओ.टी.च्या माध्यमातुन चांगल्या प्रकारची बससेवा नागरीकांना दिली जावु शकेल. अटी, शर्तीनुसार जी काही खात्री दिलेली आहे ती पुर्ण केली जाईल. चांगली बससेवा दिल्यामुळे लोकांमध्ये त्यांचे चांगले नाव होईल.

सदस्य श्री. सच्चानंद गोपलानी:—ठेकेदार जर तो परिवहन उपक्रम व्यवस्थितपणे चालवु शकत नसेल तर त्यावर काही दंडात्मक कारवाई वगैरे केली जावु शकते काय?

श्री. आशिष मिश्रा (अधिकारी, सीआरआरटी, पुणे):—अटी, शर्तीनुसार त्यावर दंडात्मक कारवाई करण्याची तरतुद आहे.

सदस्य श्री. राजेश टेकचंदानी:— परिवहन उपक्रम स्वता राबविण्या एवढी आपली महापालिका मोठी नाही. संप वगैरे झाला तर महापालिकेच्या बसेसची तोडफोड होते, काही वेळा शहर बंद केले जाते त्यावेळेस सुध्दा बसेसची तोडफोड होते. यासाठी ठेकेदार जर योग्य प्रकारे बससेवा चालवु शकला तरच तो आपणांस रॉयल्टी देवु शकेल. बसेस जर रस्त्यावर धावु शकल्या नाहीत, त्यांचा किलोमिटरचा काटा पुढे सरकला नाही तर रॉयल्टी कशी मिळु शकेल ?.

श्री. आशिष मिश्रा (अधिकारी, सीआरआरटी, पुणे):—ठेकेदाराबाबतीत जास्त लवचिक भुमिका ठेवली तर आपणांस ती अडचणीची ठरेल

सदस्य श्री. दिलीप लालवानी:— दरवर्षी काही ना काही नैसर्गीक आपत्ती येत असते, तसेच विविध कारणामुळे शहरात बंद पुकारला जात असतो अशा वेळेस बससेवा बंद होत असते. त्यामुळे रॉयल्टीची रक्कम मिळु शकणार नाही.

डॉ. दिपक सावंत(उप—आयुक्त, आरोग्य):—हा जो प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे त्यामध्ये आयुक्त साहेबांनी काही बाबींचा समावेश केला आहे.

हा प्रकल्प बी.ओ.ओ.टी. संकल्पनेवर नव्यानें राबविण्यात येत असुन याचा कुठलाही Precedence उपलब्ध नाही. तथापि Permit, Regional Transport Authority ची मान्यता, Stage चे अंतर ठरविणे, त्यांचे दर व या सबंधित सर्व आवश्यक बाबींच्या मंजु—या घेवुनच हा उपक्रम राबविता येईल

सदस्य श्री. मोहन कंडारे:— तीन चार मुददया बाबतीत आयुक्त साहेबांशी आमचे बोलणे झाले आहे. या मुददयांचा . ठरावामध्ये अंतर्भाव केला जावा. याबाबतचा हा जो ठराव आहे तो मी वाचुन दाखवितो.

ही परिवहन समिती मुळ निविदेतील अट क्र. ४५ कायम ठेवुन व सर्व कायदेशीर बाबींच्या पुर्ततेस अधिन राहून वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरात बीओओटी पध्दतीने बससेवा सुरु करणेकामी रॉयल्टी रु. ०.५५ प्रति किलो मिटर या दराने व सोबत जोडलेल्या प्रपत्रामधील कार्य योजने (ऑपरेशन प्लन) प्रमाणे प्रशासनास मे. केस्ट्रल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या उच्चत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

या ठरावा अंतर्गतचा निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.या ठरावाचे सूचक असतील श्री दिलीप लालवानी व अनुमोदक असतील श्री मोहन कंडारे.

काही सदस्य :— पास,पास....

सभापती, श्री. कृष्णा गिरीया पुजारीः— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :—** उल्हासनगर शहरात बससेवा सुरु करणे.कामी न्युनत्तम दराचे निविदाकार यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

प्रस्तावना

मुंबई प्रंतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (२०) अनुसार शहराअंतर्गत किंवा शहरांच्या हददीबाहेर महानगरपालिका जनतेच्या सोईच्या द्रष्टीने महानगर पालिकेने ठराव क्रमाक २५ दिंनाक १३/०७/२००७ अन्वये पारीत करून उल्हासनगर क्षेत्रातील पब्लीक प्राईवेट पाटीसिपेशन अंतर्गत बिल्ट ओन ओपरेट टान्सफर (बी.ओ.ओ.टी.) या तत्वावर उपक्रम चालविण्या करीता निश्चित केले महापालिकेने ठराव क्रमाक ४० दिंनाक १३/०८/२००७ अन्वये परिवहन समितीची रचनाही केलेली आहे.

उल्हासनगर महानगर पालिके तर्फे बी.ओ.ओ.टी. तत्वावर शहर बस सेवा सुरू करणे करीता माहे जुलै २००७ साली निविदा मागविण्यात आल्या होत्या परंतु शासनाने त्यांचे पत्र क्रमाक संकीर्ण —१७०६/१४३१/नवि —२८, दिंनाक ०५/१०/२००७ अन्वये परिवहन उपक्रम सुरू करण्याचा प्रस्ताव स्थगीत ठेवावे असे कळविले होते. त्या अनुषंगाने सदर मागविलेलया निविदा रदद करण्यात आल्या होत्या.

आता शासनाने त्यांचे पत्र क्रमाक उमपा/२३२२/४६७/प्र क्र ०८/नवि २१ दिंनाक १८/११/२००८ अन्वये बी.ओ.ओ.टी. तत्वावर पी.पी.पी (Public Private Participation) अंतर्गत शहर बस सेवा सुरू करावयाच्या प्रस्तावाची स्थगती उठवली आहे.

या अंनुषगाने शहर बस सेवा बी.ओ.ओ.टी. तत्वावर सुरू करावयाच्या निविदा डिसेंबर २००८ साली मागविण्यात आल्या व सदर निविदा दिंनाक ०५/०१/२००९ रोजी उघडण्यात आल्या व त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला होता. त्या तक्त्यानुसार में केस्ट्रल इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. उल्हासनगर यांची सर्वात जास्त दर व महापालिकेस मिळणारी रॉयल्टी रू ०. ५५ प्रति कि.मी. प्राप्त झालेले आहेत.

सदर निविदेची छाननी करणे करीता महापालिकेने मध्यवर्ती रास्ते वाहतुक संस्था (CIRT), पुणे यांना विनंती केली होती व सदर निविदेची छाननी करण्यास मध्यवर्ती रास्ते वाहतुक संस्था (CIRT), पुणे यांनी मान्य केले (Annexure 1).

या अनुषगाने सदर निविदेच्या संदर्भात दिंनाक १७/०१/२००९ रोजी मा. आयुक्त यांच्या दालनात श्री आाशिष मिश्रा, सदस्य व फॅक्लटी प्रमुख मध्यवर्ती रास्ते वाहतुक संस्था (CIRT), पुणे यांचे सोबत बैठक आयोजित करून चर्चा करण्यात आली. सदर चर्चेच्या अनुषगाने में. केस्ट्रल इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. उल्हासनगर यांना Operational Plan सादर करण्यास कळविले.

सदर बैठकीत मध्यवर्ती रास्ते वाहतुक संस्था (CIRT), पुणे यांच्याशी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने निविदेतील अट क्रमाक ४५ मध्यें बदल करण्यात आले.

निविदेतील अट क्रमाक ४५ खालील प्रमाणे होते.

"काही अपरिहार्य कारणांमूळे कोणत्याही मार्गावरील ही सेवा बंद असेल, उदा. रस्ता दुरूस्ती अभावी, मोर्चे, संप, अपघात किंवा कोणतीही तांत्रिक अडचण आल्यास मार्गावरील बससेवा ज्या कालवधी पर्यंत बंद असेल त्या कालावधी मधील कि.मी. वरील रॉयल्टी व्यक्ति/संस्था/फर्म/एजन्सी/कंपनी कडून घेण्यात येणार नाही. परंतु तशी लेखी सूचना व्यक्ति/संस्था/फर्म/एजन्सी/कंपनी यांनी सक्षम प्राधिकारी यांना बससेवा तात्पुरती बंद करण्याचे दोन दिवसांच्या आत देणे आवश्यक राहील."

अट क्रमाक ६५ मध्ये दिलेल्या अधिकाराचा उपयोग करून अट क्रं ४५ मध्यें खालील प्रमाणे बदल करण्यात आलेला आहे.

" कोणत्याही मार्गावरील बससेवा रस्ता दुरूस्ती अभावी बंद करता येईल, परंतु योग्य ते नियमाचे पालन करून त्वरीत पर्यायी रस्त्याने बस चालविणे बंधनकारक राहील इतर कोणत्याही कारणास्तव बस किंवा रूट मध्ये फेरफार करता येणार नाही."

सदर अट बाबत निविदाकाराने रस्ता दुरूस्ती अभावी बस रूट मध्ये बदल करण्यास मान्य केले आहे. परंतु कामागार संप व रस्ता दुरूस्ती कालावधीतील रॉयल्टी भरण्यास नकार दर्शविलेला आहे. व निविदेच्या अट क्रमाक ६३ च्या अनुषगाने निविदाकाराची कोणत्याही अटी व शर्ती स्वीकारल्या जाणार नाहीत, म्हणुन निविदाकाराची सदर अट मान्य करता येत नाही.

दिंनाक १७/०१/२००९ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने निविदाकाराने सादर केलेले Operational Plan मध्यवर्ती रास्ते वाहतुक संस्था, पुणे यांना त्याच्या सहमतीसाठी सादर केला होता. मध्यवर्ती रास्ते वाहतुक संस्था (CIRT), पुणे यांनी सदर Operational Plan ला व त्या मधील Monitoring System व Proposed Routes ला सहमती दर्शवुन सर्वात जास्त दराची निविदा में. केस्ट्रल इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. उल्हासनगर यांची निविदा मान्य करण्यास शिफारस केलेली आहे (Annexure 11 & III).

तसेच सदर निविदे संदर्भातील सर्व कागदपत्र चार्टेड आकाउन्टंट कडे पडताळणी साठी पाठविले असता त्यानी देखील सदर निविदे संदर्भात त्यांची सहमती दर्शविली व पुढील कार्यवाही करण्यास शिफारस केली आहे (Annexure 1V).

तसेच बी.ओ.ओ.टी. संकल्पनेवर नविन प्रकल्प राबविण्यात येत असुन याचा कुठलाही Precedance उपलब्ध नाही. तथापि Permit, Regional Transport Authority ची मान्यता, Stage चे अंतर ठरविणे, त्यांचे दर व या सबंधित सर्व आवश्यक बाबींची मंजु—या घेउनच हा उपक्रम राबविता येईल.

वरील सर्व बाबींचा विचार करता में. केस्ट्रल इफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. उल्हासनगर यांची सर्वात जास्त दर व महापालिकेस मिळणारी रॉयल्टी रू ०.५५ प्रति कि.मी ची निविदा व Operational Plan (Annexure V) मा. परिवहन समिती पुढे निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

<u>परिवहन समिती सभा ठराव क्र. ६</u> <u>दिनांक : २७/२/२००९</u>

सूचकाचे नाव : श्री. दिलीप लालवानी

अनुमोदकाचे नाव : श्री. मोहन कंडारे

ही परिवहन समिती मुळ निविदेतील अट क्र. ४५ कायम ठेवुन व सर्व कायदेशीर बाबींच्या पुर्ततेस अधिन राहून वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरात बीओओटी पध्दतीने बससेवा सुरु करणेकामी रॉयल्टी रु. ०.५५ प्रति किलो मिटर या दराने व सोबत जोडलेल्या प्रपत्रामधील कार्य योजने(ऑपरेशन प्लॅन) प्रमाणे प्रशासनास मे. केस्ट्रल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या उच्चतम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

या ठरावा अंतर्गतचा निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सूचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>सदस्य श्री. दिलीप लालवानी:—</u>शहरामध्ये बससेवा सुरु करणे हे महापालिकेचे १९८६ पासुनचे स्वप्न होते. ते स्वप्न आज प्रत्यक्षात उतरत असल्याचे पाहुन मनाला खुप आनंद व समाधान होत आहे. यासाठी सर्व सदस्यांना मी विनंती करतो की हा ठराव सर्वसंमतीने पारीत केला जावा. सीआयआरटीचे सदस्य श्री. आशिष मिश्रा साहेबांनी आम्हांला जे मार्गदर्शन केले त्याबद्दल परिवहन समिती त्यांची आभारी आहे. शहर ब—याच कालावधीपासुन बससेवेची प्रतिक्षा करत होते. त्या बससेवेबाबतीत परिवहन समितीने आज महत्वपुर्ण निर्णय घेतलेला आहे. प्रगतीच्या मैलाच्या दगडाचा एक टप्पा आपण पार पाडला आहे. आणि त्याबद्दल सर्वांना मी धन्यवाद देतो.

<u>सदस्य श्री. मिलिंद चोडनकर:—</u>विद्यमान सभापतींच्या कार्यकालावधीत ही बससेवा सुरु व्हावी त्यासाठी सर्वांनी सहकार्य करुन हा जो ठराव पारीत केला आहे त्याबद्दल मी सर्वांना धन्यवाद देतो.

<u>सदस्य डॉ. विजय पाटील:—</u>या महत्वपुर्ण प्रस्तावाबाबतीत सर्वांनी जे सहकार्य केले त्याबद्दल सर्वांना धन्यवाद।

<u>डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, आरोग्य):—</u> परिवहन उपक्रमाच्या प्रस्तावाबाबत रस्ते वाहतुक संस्थेचे श्री. मिश्रा साहेबांनी जो खुलासा केला, परिवहन उपक्रमाबाबतीत जी माहिती दिली त्याबद्दल महापालिका त्यांची आभारी आहे. उपक्रम चालु झाल्यानंतर आपणा सर्वांना प्रशिक्षण देण्याची त्यांनी व्यवस्था करावी अशी मी विनंती करतो. परिवहन समितीचे सर्व सन्माननिय सदस्य व संबंधीत अधिका—यांनाही धन्यवाद देतो.

<u>सभापती, श्री. कृष्णा गिरीया पुजारी:—</u>या सभेचे कामकाज संपल्याचे मी जाहीर करतो

दुपारी ३.५५ वाजता सभापती श्री. कृष्णा गिरीया पुजारी यांनी सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—२४/४/२००९

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २४/४/२००९ रोजीच्या परिवहन समितीचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेच्या **परिवहन समितीची** विशेष सभा शुक्रवार दिनांक २४/४/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत श्री. सुब्बाराव पाटील, अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

| अ.क्र. | सदस्याचे नाव |
|---|---|
| १ | श्री. कृष्णा गिरीया पुजारी |
| २ | सभापती, स्थायी समिती तथा सदस्य |
| ३ | श्री. दिलीप जेठानंद लालवानी |
| ४ | श्री. सच्चानंद गोपलानी |
| ५ | श्री. सुनिल एस. गंगवानी |
| ६ | श्री.आशेराम इतवारी टाक |
| ७ | श्री. मोहन रामसिंग कंडारे |
| ८ | डॉ. श्री. विजय रुपसिंग पाटील |
| ९ | श्री. जर्नादन किसन ढोके |
| १० | श्री.मिलिंद जगन्नाथ चोडनकर |

तर

खालील दर्शविलेले सदस्य अनुपस्थित होते.

१ श्री. राजेश मुरलीधर टेकचंदानी, २. श्री. राणा सगु, ३. श्री. लालता प्रसाद शिवमुर्त तिवारी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. रमेश भदाणे, सहा. प्रादेशिक संचालक, न.पा.प्र., कोकण विभाग
२. श्री. समिर उन्हाळे, आयुक्त
२१. श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त
३. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४. श्री. मिलिंद सावंत, उप—आयुक्त
५. डॉ. दिपक सावंत, उप—आयुक्त
६. श्री. अनंत कांबळे, उप मुख्य लेखा परिक्षक
७. डॉ. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
२२. श्री. एस.जी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
८. डॉ. राजा रिजवानी, वैदयकीय अधिकारी
९. श्री. बबीश गंगारामानी, उप अभियंता, विदयुत विभाग
१०. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. गणेश शिंपी
२. श्रीमती नर्गिस खान

दुपारी १२.०५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव</u> :—मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ मधील नियम—४ अन्वये परिवहन समिती सभापती पदाच्या निवडणूकीसाठी बोलविलेल्या आजच्या या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. सुब्बाराव पाटील, अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग हे आहेत.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. १ :— परिवहन समिती सदस्यांमधुन एका सदस्याची सभापती पदी निवड करणे.**

---

<u>श्री. सुब्बाराव पाटील (पीठासीन अधिकारी):—</u>

**परिवहन समिती सभापती** पदासाठी महापालिका सचिव यांचेकडे **दिनांक २०/४/२००९** रोजी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये **एका** उमेदवाराचे नाममनिर्देशन पत्र प्राप्त झाले असून त्याचे नाव पुढीलप्रमाणे आहेः—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. गंगवानी सुनिल साहेबराव |

परिवहन समिती सभापती पदाच्या निवडणूका संबंधातील मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ नियम—०५ (२) अन्वये, पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी नामनिर्देशन पत्राची छाननी केली आहे. छाननीमध्ये नामनिर्देशन पत्र वैध ठरले आहे उमेदवाराचे नाव पुढीलप्रमाणे आहेः—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. गंगवानी सुनिल साहेबराव |

आता, परिवहन समिती सभापती पदाच्या एका जागेसाठी एकच उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याने मी पुढीलप्रमाणे निकालाची घोषणा करीत आहे :—

<u>निकाल घोषणा</u>

महापालिका सचिवांनी दिनांक ८/४/२००९ रोजी काढलेल्या सूचने अन्वये परिवहन समिती च्या सर्व सदस्यांना परिवहन समिती सभापती पदाचा निवडणूक कार्यक्रम कळविण्यांत आला होता. त्या अनुषंगाने दिनांक २०/४/२००९ रोजी एकमेव उमेदवार श्री. सुनिल साहेबराव गंगवानी यांनी आपले नामनिर्देशनपत्र विहीत कालावधीत दाखल केले होते.

परिवहन समिती सभापती पदासाठी एकमात्र वैध नामनिर्देशन दाखल करण्यात आले असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ च्या नियम—६ मधील पोटनियम—१ अन्वये पीठासीन अधिकारी म्हणून मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये परिवहन समिती सभापती पदाचे उमदेवार ***श्री. सुनिल साहेबराव गंगवानी*** हे **बिनविरोध** निवडून आल्याचे जाहिर करतो.

सही XXX
(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :—२४/४/२००९

स्थान :— उल्हासनगर महानगरपालिका सभागृह

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२४/४/२००९

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २४/४/२००९ रोजीच्या परिवहन समितीचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेच्या **परिवहन समितीची** विशेष सभा शुक्रवार दिनांक २४/४/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत श्री. सुब्बाराव पाटील, अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

| अ.क्र. | सदस्याचे नाव |
|---|---|
| १ | श्री. कृष्णा गिरीया पुजारी |
| २ | सभापती, स्थायी समिती तथा सदस्य |
| ३ | श्री. दिलीप जेठानंद लालवानी |
| ४ | श्री. सच्चानंद गोपलानी |
| ५ | श्री. सुनिल एस. गंगवानी |
| ६ | श्री.आशेराम इतवारी टाक |
| ७ | श्री. मोहन रामसिंग कंडारे |
| ८ | डॉ. श्री. विजय रुपसिंग पाटील |
| ९ | श्री. जर्नादन किसन ढोके |
| १० | श्री.मिलिंद जगन्नाथ चोडनकर |

तर

खालील दर्शविलेले सदस्य अनुपस्थित होते.

१, २

खालील अधिकारी सभेस हजर होते

.१.

२

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री.

२

सायंकाळी ४..०५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

महापौर :—मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ मधील नियम—१२ अन्वये शिक्षण मंडळ सभापती पदाच्या निवडणूकीसाठी आजची ही विशेष सभा बोलाविण्यांत आली आहे,

महापालिका सचिस :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—** उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या सदस्यापैकी एका सदस्याची सभापती पदासाठी निवड करणे

---

महापौर /पीठासीन अधिकारी :— शिक्षण मंडळ **सभापती** पदासाठी आज **दिनांक** ७/९/२००९ रोजी माझे कडे या सभेत ठरवून दिलेल्या वेळेमध्ये **एका** उमेदवाराचे नाममनिर्देशन पत्र प्राप्त झाले असून त्याचे नाव पुढीलप्रमाणे आहे:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|

| | |
|---|---|
| १. | श्री. नरेंद्र उत्तम साळवे |

शिक्षण मंडळ सभापती पदाच्या निवडणूका संबंधातील मुंबई प्राथमिक शिक्षण नियम–१९५० अनुसुची ड मधील विहीत केलेल्या रितीने , पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी नामनिर्देशन पत्राची छाननी केली आहे. छाननीमध्ये नामनिर्देशन पत्र वैध ठरले आहे उमेदवाराचे नाव पुढीलप्रमाणे आहे:–

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. नरेंद्र उत्तम साळवे |

आता, शिक्षण मंडळ सभापती पदाच्या एका जागेसाठी एकच उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याने मी पुढीलप्रमाणे निकालाची घोषणा करीत आहे :–

## निकाल घोषणा

महापालिका सचिवांनी दिनांक १/९/२००९ रोजी काढलेल्या सूचने अन्वये शिक्षण मंडळाच्या सर्व सदस्यांना शिक्षण मंडळाच्यासभापती /उप सभापती पदाचा निवडणूक कार्यक्रम कळविण्यांत आला होता. त्या अनुषंगाने दिनांक ७/९/२००९ रोजी एकमेव उमेदवार श्री. **नरेंद्र उत्तम साळवे** यांनी आपले नामनिर्देशनपत्र विहीत कालावधीत दाखल केले आहे.

शिक्षण मंडळाचे सभापती पदासाठी एकमात्र वैध नामनिर्देशन दाखल करण्यात आले असून मुंबई प्राथमिक शिक्षण नियम–१९४९ अनुसुची ड मधील नियम–१(अ) अन्वये पीठासीन अधिकारी म्हणून मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये शिक्षण मंडळ सभापती पदाचे उमेदवार ***श्री..*** **नरेंद्र उत्तम साळवे** हे **बिनविरोध** निवडून आल्याचे जाहिर करते.

दिनांक :–७/९/२००९

स्थान :– उल्हासनगर महानगरपालिका
शिक्षण मंडळ सभागृह

महापौर / पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

यानंतर नवनिर्वाचित सभापती श्री नरेद्र उत्तम साळवे हे पीठासीन अधिकारीस्थानी आसनस्थ झाले

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— ९/७/२००९

दि. ९/७/२००९ रोजी घेण्यांत आलेल्या परिवहन समिती सभेचे इतिवृत्त.

२

उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन समितीची सभा गुरुवार दिनांक ९/७/२००९ रोजी सांयकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. सुनिल एस. गंगवानी | सभापती, परिवहन समिती |
| २ | श्री. सच्चानंद गोपलानी | सदस्य |
| ३ | श्री. कृष्णा गिरीया पुजारी | सदस्य |
| ४ | श्री.आशेराम इतवारी टाक | सदस्य |
| ५ | श्री. राजेश मुरलीधर टेकचंदानी | सदस्य |
| ६ | श्री. मोहन रामसिंग कंडारे | सदस्य |
| ७ | श्री. दिलीप जेठानंद लालवानी | सदस्य |
| ८ | डॉ. श्री. विजय रुपसिंग पाटील | सदस्य |
| ९ | श्री.मिलिंद जगन्नाथ चोडनकर | सदस्य |
| १० | श्री. जर्नादन किसन ढोके | सदस्य |

तर,

१. श्रीमती जया प्रकाश माखिजा, २. श्री. राणा सगु, ३. श्री.लालता प्रसाद शिवमुर्त तिवारी हे सभेस अनुपस्थित होते/होत्या.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

२३.श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त
२४.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
२५.श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

६. श्री. श्याम शिवनानी
७. श्री. तानाजी पतंगराव

सांयकाळी ४.१० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

महापालिका सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १ :— मागील सभेचे दिनांक २७/२/२००९ व दिनांक २४/४/२००९

रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

काही सदस्य :—पास, पास.....

सभापती, श्री. सुनिल गंगवानी:- दिनांक २७/२/२००९ व दिनांक २४/४/२००९ रोजीच्या परिवहन समितीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १** :— मागील सभेचे दिनांक २७/२/२००९ व दिनांक २४/४/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. मोहन कंडारे

अनुमोदकाचे नांव : श्री. दिलीप लालवानी

परिवहन समिती ठराव क्र. :— ६ अ    दिनांक:— ०९/७/२००९

ही परिवहन समिती महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक २७/२/२००९ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ३५ पर्यंतचे व दिनांक २४/४/२००९ रोजीचे पृष्ठ क्र १ ते २ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करीत आहे.

एकमताने

सभापती / पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

विषय क्र. २ :— परिवहन समितीच्या १३ सदस्यांपैकी कोणते ६ सदस्य निवृत्त होतील ते चिट्ठया टाकुन ठरविणे.

---

महापालिका सचिव :—दिनांक २३/८/२००७ रोजीच्या महासभेत ठराव क्र. ४० अन्वये १३ सदस्यांची परिवहन समितीचे सदस्य म्हणुन नेमणुक केली होती.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५ (५) प्रमाणे सदर परिवहन समिती सदस्यांपैकी निम्मे सदस्य पुढील प्रत्येक दुस—या वर्षी पोटकलम (२) मध्ये विर्निदीष्ट केलेली सभा ज्या महिन्यात भरली

असेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस निवृत्त होतील अशी तरतुद आहे. त्याबाबत चिठ्ठया टाकुन निर्णय करण्यात येईल.

या समितीवर स्थायी समिती सभापती या पदसिध्द सदस्य असल्याने निवृत्त होणा—या सदस्यांमध्ये त्यांच्या नावाची चिठ्ठी यामध्ये नाही. त्यांचे नाव वगळुन १२ सदस्यांच्या नावाच्या या १२ चिठ्ठया माझ्या हातात आहे. त्यातील एक—एक चिठ्ठीवरील नाव मी वाचुन दाखवितो. सर्व सदस्यांची नावे आहेत किंवा नाही याची आपण खात्री करुन घ्या. या सर्व चिठ्ठया प्लॅास्टीकच्या पारदर्शक बरणीत टाकण्यात येतील. बरणी हलवुन त्यातील एक—एक चिठ्ठी याप्रमाणे सहा चिठ्ठया काढल्या जातील. काढण्यात आलेल्या चिठ्ठीवर ज्या सदस्याचे नाव लिहिलेले असेल तो सदस्य दिनांक १/८/२००९ पासुन परिवहन समिती सदस्य पदावरुन निवृत्त होईल.

<u>सभापती, श्री. सुनिल गंगवानी :—</u>आता चिठ्ठया काढण्यात येतील. त्या या सभेत आयुक्ताच्या स्थानी आसनस्थ असलेले प्राधिकृत अधिकारी श्री. अशोककुमार रणखांब साहेब यांच्याकडे सुपुर्द केल्या जातील. श्री. रणखांब साहेब त्या चिठ्ठयांवरील मजकुर वाचुन दाखवतील.

आता ही प्रक्रिया सुरु होत असून चिठ्ठी काढण्यासाठी मी एकेकास निमंत्रीत करतो.

| अ.क्र. | चिठ्ठी काढणा—याचे नाव | निवृत्त होणा—या सदस्याचे नाव |
|---|---|---|
| १. | श्री. प्रकाश कुकरेजा | डॉ. विजय पाटील |
| २. | श्री. दिलीप लालवानी | श्री. राणा सगु |
| ३. | श्री. आशेराम टाक | श्री. जे.के. ढोके |
| ४. | श्री. मोहन कंडारे | श्री. दिलीप लालवानी |
| ५. | श्री. राजेश टेकचंदानी | श्री. सच्चानंद गोपलानी |
| ६. | श्री. सच्चानंद गोपलानी | श्री. आशाराम टाक |

<u>सभापती, श्री. सुनिल गंगवानी:—</u>वर उल्लेख केलेल्या ६ सदस्यांना दिनांक १/८/२००९ पासुन परिवहन समितीस सदस्याचे पद सोडावे लागेल. त्यामुळे खालील नमुद केलेले सदस्य पुढील वर्षासाठी परिवहन समितीवर सलगपणे कार्यरत राहतील.

१. श्री. मिलिंद चोडणकर
२. श्री. लालता प्रसाद तिवारी
३. श्री. मोहन कंडारे
४. श्री. राजेश टेकचंदानी
५. श्री. कृष्णा गिरीया पुजारी
६. श्री. सुनिल गंगवानी
७. तसेच पदसिध्द सभापती म्हणुन स्थायी समिती सभापती श्रीमती जया माखिजा

<u>सभापती, श्री. सुनिल गंगवानी:—</u> चिठ्ठयांद्वारे सदरच्या विषयाबाबत पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. २:—** परिवहन समितीच्या १३ सदस्यांपैकी कोणते ६ सदस्य निवृत्त होतील ते चिठ्ठया टाकुन ठरविणे.

<u>प्रस्तावना</u>

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५ मधील तरतुदीनुसार परिवहन उपक्रम चालविण्याच्या प्रयोजनासाठी तेरा सदस्यांची एक परिवहन समिती स्थापन केली पाहिजे अशी तरतुद आहे.

उपरोक्त तरतुदी नूसार उल्हासनगर महानगरपालिकेने महासभा ठराव क्र.४०, दिनांक २३/०८/२००७ अन्वये तेरा सदस्यीय परिवहन समितीची स्थापना केली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५ (५) नुसार परिवहन समितीच्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य पुढील प्रत्येक दुसऱ्या वर्षी पोट–कलम २ मध्ये निर्दिष्ट केलेली सभा ज्या महिन्यात भरली असेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस निवृत्त होतील अशी तरतुद आहे.

महासभा ठराव क्र.४०, दिनांक २३/०८/२००७ अन्वये तेरा सदस्यीय परिवहन समितीची स्थापना करण्यात आलेली असल्याने परिवहन समितीच्या विद्यमान तेरा सदस्यांमधुन सहा सदस्यांच्या निवृत्तीसाठी सोडत काढणेकामी परिवहन समितीपुढे प्रस्तावित.

## परिवहन समिती ठराव क्रं. ७ दिनांक ९/०७/०९

ही परिवहन समिती चिठ्ठया काढल्या नंतर पूढील ६ परिवहन समिती सदस्य दिनांक १/८/२००९ पासून निवृत्त होतील असे ठरवत आहे.

१) डॉ विजय पाटील

२) श्री. राणा सगु

३) श्री. जे.के ढोके

४) श्री. दिलीप लालवानी

५) श्री. सच्चानंद गोपलानी

६) श्री. आशेराम टाक

चिठ्ठयाव्दारे मंजूर

सभापती/पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सभापती, श्री. सुनिल गंगवानी:–**या सभेचे कामकाज संपल्याचे मी जाहीर करतो

सांयकाळी ४.१० वाजता सभापती श्री. सुनिल गंगवानी यांनी सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका